# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## कुलसचिव कार्यालय

एम.आय.डि.सी. रोडकॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५


जावक क्रमांक/गो.वि./कु.स.का./६७३६/२०२३ दिनांक ०१/०८/२०२३ 08

## परीपत्रक

**विषय — अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश शिष्यवृत्तीच्या सबबीखाली रद्द न करण्याबाबत.**

संदर्भ — मा. आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/नस्ती क्र.१०/२०२३/ का-४क/२०२३-२४/३७२२ दिनांक २४/०७/२०२३

उपरोक्त मा. आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण तसेच उच्च शिक्षण घेण्याकरीता खालील योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यात बऱ्याच वर्षापासुन राबविण्यात येतात.

१. केंद्रशासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना.
२. राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क परीक्षा प्रतिपूर्ती योजना.
३. राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.
४. व्यावसायिक पाठयक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

सदर योजना सन २०१८-१९ पासुन राज्य शासनाने विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन राबविण्यात येतात. त्याचप्रमाणे उपरोक्त संदर्भीय पत्रात नमुद प्रमाणे केंद्रशासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सुचना राज्यशासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या दिनांक ०७ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू केलेल्या आहेत. त्यानुसार चालू शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ पासुन विद्यार्थ्यांनी ज्या दिवशी प्रवेश घेतलेला आहे त्याच दिवशी ऑनलाईनरित्या शिष्यवृत्तीचा अर्ज भरून घेणे आवश्यक आहे व त्यासंबंधीत महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करून पुढील कार्यवाहीस्तव संबंधीत जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे ऑनलाईनरित्या अग्रेषीत करणे आवश्यक आहे. अन्यथा याबाबत भविष्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत शिष्यवृत्ती प्रक्रीया पूर्ण न झाल्याने काही अडचणी निर्माण झाल्यास त्याकरीता संबंधीत महाविद्यालयाची जबाबदारी असून त्याबाबत सदर महाविद्यालयावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

सोबत — संदर्भीय पत्र

(डॉ. अनिल हिरेखन)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी —

१. मा.कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा. प्र-कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा.वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५. पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६. संगणक प्रमुख सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

(डॉ. हेमंत के. बारसागडे)
उपकुलसचिव (विद्या विभाग)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दूरध्वनी क्र. ०२० २६१२७५६९ ईमेल directorsocialfare@yahoo.co.in

क्र.सकआ/शिक्षण/भासशि/नस्ती क्र.१०/२०२३/का.१४क/२०२३ २४८ दिनांक: २५/०७/२०२३

प्रति,

मा. कुलगुरु,
राज्यातील सर्व विद्यापिठे

विषय: अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश शिष्यवृत्तीच्या सबबीखाली रद्द न करण्याबाबत...

संदर्भ: १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१, दिनांक ८ डिसेंबर, २०१७
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/शिक्षण-१, दिनांक ८ जानेवारी, २०१९
३) शासन निर्णय,क्रमांक अजाशि-२०१९/प्र.क्र.३४५/शिक्षण-१, दि.१५ जानेवारी, २०२०
४) श्री.अनिल वाणी, बहुजन विद्यार्थी संघटना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांचे निवेदन दि.१६ जानेवारी, २०२३
५) शासन निर्णय क्रमांक: भासशि-२०२१/प्र.क्र.१५६/शिक्षण-१, दि.०७ जुलै, २०२३

महोदय,

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यांत येतात. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण तसेच उच्च शिक्षण घेण्याकरीता खालील योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यात ब-याच वर्षापासून राबविण्यांत येतात.

१. केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना.
२. राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क परीक्षा प्रतिपूर्ती योजना.
३. राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.
४. व्यवसायिक पाठयक्रमात शिकणा-या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

सदर योजना सन २०१८-१९ पासून राज्य शासनाने विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन राबविण्यांत येतात. दरवर्षी सुमारे चार लाख अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ त्यांच्या आधार संलग्निकृत बँक खात्यामध्ये यशस्वीरित्या वितरीत करण्यांत येत आहेत.

संदर्भीय क्र. २ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार राज्यात राबविण्यांत येणारे विविध अभ्यासक्रम, त्यांची शुल्क रचना, (शिक्षण शुल्क, विकास शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क) इत्यादीबाबींचा समावेश संबंधित शासकीय विभाग, सक्षम प्राधिकरण, विविध विद्यापिठे, परिषदा इत्यादी संबंधित अधिकृत प्राधिकारणाने महाडीबीटी प्रणालीमध्ये वेळोवेळी अद्यावत करणे आवश्यक आहे. यामध्ये सामाजिक न्याय विभागाने संबंधित सक्षम प्राधिकरणांनी अधिकृत केलेली शुल्क रचना लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वितरीत करणे आवश्यक आहे.

Registrar, pl do needful at the earliest and revert
27/7/2023

A.R. (Q.C.cell)
Pl. submit as per instruction given
28/7/2023
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

श्री टेकाम,
तात्काळ सादर करावे.
28-7-2023

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

तथापि, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, शिक्षण शुल्काचा भाग असलेले विकास शुल्क शिष्यवृत्तीद्वारे वितरित होत असताना देखील आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या काही महाविद्यालयांमध्ये अद्यापही विकास शुल्काची स्वतंत्र मागणी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे व सदर विकास शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये महाविद्यालयांद्वारे अडथळा निर्माण केला जात आहे.

त्याचप्रमाणे सद्यस्थितीत राज्यभरातील विद्यार्थी, त्यांचे पालक, संबंधित महाविद्यालये व विविध विद्यार्थी संघटना यांनी अद्यापही राज्यातील ब-याच अभ्यासक्रमांची इतर शुल्क त्यांच्या संबंधित विद्यापीठाने महाडीबीटी प्रणालीमध्ये अद्यावत केली नसल्याचे आयुक्तालयाचे निदर्शनास आणून दिले आहे. उपरोक्त दोन्ही ही बाबी अत्यंत गंभीर स्वरुपाच्या असून याबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

तेंव्हा आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या संबंधित महाविद्यालयांना खालील ठळक बाबी करिता विशेष सूचना निर्गमित करण्यात याव्यात.

१) त्याअनुरोधाने आपणांस कळविण्यांत येत आहे की, आपल्या विद्यापीठांतर्गत राबविण्यांत येणा या विविध अभ्यासक्रमांपैकी जर कोणत्याही अभ्यासक्रमाचे इतर शुल्क रचना महाडीबीटी प्रणालीवर अद्यावत केली नसल्यास ती तात्काळ माहिती व तंत्रज्ञान विभागाचे महाआयटी कार्पोरेशन यांच्याशी संपर्क साधून तात्काळ अद्यावत करावी. जेणेकरुन अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्ज मंजूर होऊन त्यांची शिष्यवृत्तीची रक्कम विहित वेळेत प्रणालीव्दारे वितरीत होईल.

२) कोणत्याही एखाद्या अभ्यासक्रमाच्या एकूण शुल्क रचनेमध्ये इतर शुल्काचे प्रमाण हे अत्यल्प असून देखील केवळ विद्यापीठाने प्रणालीमध्ये अद्यावत न केले असल्याने मोठया प्रमाणात आपल्या विद्यापीठांतर्गत शिकत असलेले अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी संपूर्ण शिष्यवृत्तीच्या रकमेपासून वंचित रहात असल्याची दाट शक्यता दिसून येत आहे. तरी आपणांस विनंती करण्यांत येत आहे की, सदरील इतर शुल्क संदर्भीय अ.क्र.३ च्या शासन निर्णयान्वये देय असलेल्या १६ बाबींनुसार तात्काळ प्रणालीमध्ये अद्यावत करुन देण्यांत यावे.

३) त्याचप्रमाणे आपणास अवगत करण्यात येत आहे की, केंद्रशासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यशासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या दि.०७/०७/२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू केलेल्या आहेत. त्यानुसार चालू शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ पासून विद्यार्थ्यांनी ज्या दिवशी प्रवेश घेतलेला आहे त्याच दिवशी ऑनलाईनरित्या शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन घेणे आवश्यक आहे व त्यासंबंधित महाविद्यालयाने विद्यार्थ्याच्या अर्जाची पडताळणी करुन पुढील कार्यवाहीस्तव संबंधित जिल्हयातील सहाय्य आयुक्त, समाज कल्याण, कार्यालयाकडे ऑनलाईन रित्या अग्रेसित करणे आवश्यक आहे. अन्यथा याबाबत भविष्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत शिष्यवृत्ती प्रक्रीया पूर्ण न झाल्याने काही अडचण निर्माण झाल्यास त्याकरिता संबंधित महाविद्यालयाची जबाबदारी असून त्याबाबत सदर महाविद्यालयावर आपल्यास्तरावरुन योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता आपणास कळविण्यात येते की, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्ती करिता राज्य शासनाने सन २००३ पासून वेळोवेळी निर्देश व मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील शासकिय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांना शिष्यवृत्ती मंजूरीचे अधिकार प्रदान करण्यात आले असले तरी त्यावर सामाजिक न्याय विभागाचे नियंत्रण राहील. सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना वेळोवळी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क /परीक्षा शुल्क देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. यात विलंब, गैरप्रकार, काही अपहार अथवा विद्यार्थ्यांच्या

Scanned with OKEN Scanner

कागपत्रांची अडवणूक झाल्यास संबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालय यांचे विरुध्द दंडनिय कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना विभागांतर्गतील सर्व क्षेत्रिय कार्यालयामार्फत देखील वेळोवेळी महाविद्यालयांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मागासलेपण दूर करणे ही विद्यापीठाची / शासनाची संविधानिक जबाबदारी आहे. उपरोक्त नमूद परिस्थितींमध्ये शिष्यवृत्ती अभावी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक अभ्यासक्रमात कोणत्याही प्रकारचा खंड पडू नये याची खातरजमा आपल्या स्तरावरुन व आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांमध्ये करावयाची आहे.

राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती करण्याकरिता शासनस्तरावरुन राबविण्यात येणा-या योजनांची सर्व शैक्षणिक घटकांनी परिपूर्णता करणे आवश्यक आहे. तसे विहित वेळेत होत नसल्याचे निदर्शनास आल्यास संविधानातील प्रयोजनाचे उल्लंघन होत असल्याचे ग्राह्यधरुन संबंधित शैक्षणिक सक्षम प्राधिकरणास जबाबदार धरण्यात येईल, याची जाणीव आपण कृपया संबंधितांना करुन दयावी ही विनंती. आपणाकडून सहकार्याच्या अपेक्षेसह.

आपला विश्वासू,

24-07-23

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त,
समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.
१) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
२) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई-३२
२) मा. सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२
३) विशेष कार्यकारी अधिकारी, मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
४) श्री.अनिल वाणी, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, बहुजन विद्यार्थी संघटना

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
१) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग सर्व.
२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सर्व.

आपणांस कळविण्यांत येते की, सदरहू पत्रव्यवहाराची प्रत व्यक्तीश: संबंधित जिल्हयातील विद्यापीठाचे कुलगुरु अथवा निबंधक यांची भेट घेऊन पोहच करुन याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाचे विभागाच्या वतीने निवेदन करावेत.

Scanned with OKEN Scanner